# श्री गुरु ग्रंथ साहिब

## मूळवाणी, देवनागरी लिपी, अवघड शब्दांचे मराठी अर्थ व मराठी भावानुवादासहित

### खंड १


**विनायक लिमये**

**तारासिंह गोरोवाडा**



प्रकाशक

**तारासिंह गोरोवाडा**

**सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे**

फोन : (नि.) (०२०) २४३७५२९६

मोबाईल. : ९८२२८६७७७८

**प्रकाशक :**
तारासिंह गोरोवाडा
सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे
घ. क्र. १०३७, धनकवडी, पुणे ४३.

© सर्व हक्क प्रकाशकांचे आधीन

**अक्षरजुळणी :**
का. वि. शिगवण
अक्षरवेल
सी १८, प्लॉट नं. ५७२, सर्व्हे नं. १२९,
श्री गणेश सोसायटी, दत्तवाडी, पुणे ३०.

**प्रथमावृत्ती :** ऑगस्ट २००८

**मुद्रक :**

**मुद्रण संशोधन :**
विवेक विसाळ
१२५ सोमवार, पुणे ४११०३३
मो. - ९४ २३ ५७ ४५ ३८

**गुरुवाणी ही ईश्वरीय वाणी आहे. त्याचा योग्य आदर व्हावा.**

# प्रकाशकीय

श्री गुरू ग्रंथ साहिब हा एक अमोलिक ग्रंथराज असून तो बारावी शताब्दी ते सोळाव्या शताब्दी पर्यंतच्या भारतातील भक्ती विचारांचा महाकोश आहे. त्यामुळे तो भारतीय संस्कृतीच्या एकात्मकतेचा प्रतिक आहे. पण असे असूनही तो गुरुमुखी लिपीत लिहिला गेला असल्याने ती लीपी जाणणाऱ्यांशिवाय तो अन्य कोणासही माहीत नाही. त्यामुळे त्यातील प्रेरणादायी विचारही इतर भारतीय जनतेस माहीत नाहीत. ह्यापूर्वी श्री गुरू ग्रंथ साहिबचा अनुवाद फक्त हिंदीतच झाला आहे. तरीही भारतातील इतर भाषा भगिनी व त्यांचा वापर करणारे भारतीय बांधव श्री गुरू ग्रंथ साहिबच्या दिव्य संदेशास अद्यापही वंचितच राहिलेले आहेत.

पंजाब व महाराष्ट्र यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. लाल, बाल आणि पाल ह्या महात्रयींनी ब्रिटिश साम्राज्याला हादरे दिले. भगतसिंग व राजगुरू यांनी तर बॉम्ब टाकून ब्रिटिश सरकारला जबरदस्त धक्का दिला. पंजाबी क्रांतिकारक व मराठी क्रांतिकारक डॉ. पांडुरंग खानखोजे यांच्या गदर आंदोलनाने ब्रिटिशांच्या तोंडचे पाणी पळवले. महाराष्ट्र व पंजाबमधील हे राजकीय संबंध सर्व जण जाणतात. पण महाराष्ट्र व पंजाबमधील सांस्कृतिक संबंध कितपत माहिती आहेत ?

मराठी संत नामदेव यांनी पंजाबात श्री गुरू नानक देवांच्या जन्मापूर्वी दोनशे वर्ष म्हणजे बाराव्या शतकात भक्ती संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली हे किती जणांना माहीत आहे ? संत नामदेव यांच्याबरोबरच भक्त त्रिलोचन व भक्त परमानंद या मराठी संतांनी पंजाबात भक्ती संप्रदायाचा प्रचार केला. हे किती मराठी जनांना माहीत आहे ? ह्या तिघांच्या पंजाबी भाषेतील रचनाही श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये संकलित केल्या आहेत. ह्यातील अत्यल्प माहिती मराठी माणसास आहे.

सिख्ख व मराठी बांधव यांच्यामधील हे सांस्कृतिक बंध अधिक दृढ व्हावेत. ह्यासाठी श्री गुरू ग्रंथ साहिबचा मराठी अनुवाद होणे जरूरीचे आहे असे आम्हास वाटले म्हणून आम्ही त्या प्रयत्नास लागलो. हे काम एकट्या दुकट्याचे नाही. ही सामुहिक जबाबदारी आहे. म्हणून आम्ही 'शीख धर्म प्रचार कमिटी' हा सार्वजनिक विश्वस्त न्यास स्थापन करून तो धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातून नोंदणी करून घेतला. त्याचप्रमाणे आयकर आयुक्त पुणे यांचे कार्यालयातून ह्या न्यासास मिळणाऱ्या देणग्या ह्या आयकर कायदा कलम ८० जी अन्वये कर सवलतीस पात्र आहेत असे आज्ञापत्र ही प्राप्त केले. त्यानंतर श्री गुरू ग्रंथ साहिबच्या प्रत्यक्ष अनुवादाचे कार्य सुरू केले. हे काम सोपे नव्हते. पण शीख धर्म प्रचाराकमिटीचे दोघे विश्वस्त श्री विनायकराव लिमये व स. तारासिंह गोरोवाडा ह्यांनी ती जबाबदारी स्वीकारली व हे काम पूर्ण केले. त्याबद्दल शीख धर्म प्रचार कमिटी त्यांचे ऋणी आहे.

श्री गुरू ग्रंथ साहिब हा ग्रंथ १४३० पृष्ठांचा आहे. त्याचे देवनागरी लिप्यांतर, पंजाबी शब्दांचे मराठी अर्थ व मराठी भावार्थ ह्यामुळे मराठी अनुवादाची सुमारे ४००० पाने झाली आहेत. त्याशिवाय मराठी माणसास अधिक माहिती व्हावी

म्हणून आम्ही ओळख पंजाबी भाषेची, श्री गुरू ग्रंथ परिचय, श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये ज्यांची वाणी अंकित केली गेली आहे. त्या सहागुरूंची व प्रमुख भक्तांची चरित्रे ही अनुवादाबरोबर दिली आहेत. हे सर्व वाङ्मय सात खंडात प्रसिद्ध करत आहोत.

ह्यापूर्वी आम्ही

१) जपुजी साहिब - श्री गुरू नानकदेव यांची वाणी
२) ऐक रे मना - श्री गुरू ते गबहादर यांची वाणी
३) सुख मनी साहिब - श्री गुरू अरजनदेव यांची वाणी.
४) नामा म्हणे - श्री गुरू ग्रंथ साहिबमधील संत नामदेव यांची वाणी.
५) ओअंकार आणि सिध गोसटी - श्री गुरू नानकदेव यांची वाणी.
६) म्हणे कबीर - श्री गुरू ग्रंथ साहिबामधील भक्त कबीर यांची वाणी ही सहा पुस्तके प्रकाशित केली.

आजपर्यंत प्रकाशित केलेली पुस्तके आम्ही विनामूल्य वितरित केली आहेत. पण हे कोशवाङ्मय विनामूल्य देणे अशक्य आहे. पण त्यास लागणारा कागद व छपाईचा भार 'गुरुतागद्दी त्रिशताब्दी समारोह समितीने उचलल्यामुळे आम्ही ते किमान मूल्य आकारून वितरित करीत आहोत. **ते विक्रीमूल्य नसून देणगी मूल्य आहे.** ह्या शुभ कार्यास मराठी बांधवांनी हे किमान देणगी मूल्य देऊन ''श्री गुरू ग्रंथसाहिबचा हा मराठी अनुवाद आपल्या संग्रही ठेवून त्याचा अभ्यास करावा. त्यातील विचार व मराठी संतांचे विचार ह्यात खूप साम्य असल्याचे त्यांना आढळेल व भारतीय एकात्मकतेची अनुभूती प्राप्त होईल.

सदर सात खंडांपैकी पहिला खंड मराठी वाचकांना सादर करताना आम्हास आनंद होत आहे. ह्या खंडाची अक्षरजुळणी 'अक्षरवेल' चे श्री. का. वि. शिगवण यांनी केली असून छपाई श्री. बांदेकर ह्यांनी केली आहे. कागद व छपाईचा भार 'गुरुतागद्दी त्रिशताब्दी समिती'ने उचलला आहे. मुद्रण संशोधन श्री. विवेक विसाळ व सौ. माधवी जोशी ह्यांनी केले आहे. ह्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये ज्या रचना मोठ्या आहेत. त्यांचा वाचकांस अर्थ समजावा म्हणून विभागून लिहिल्या आहेत. ह्याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**स. तारसिंह गोरोवाडा**
कार्याध्यक्ष
शीख धर्म प्रचार कमिटी पुणे.

# अनुवादकाचे मनोगत

**मूकं करोति वाचालम पङ्गुं लंघयते गिरिम् ।**
**यत्कृपा तमहं वंदे परमानंद सागरम् ।।**

''ज्याच्या कृपेने मुका माणूसही घडाघडा बोलू लागतो, पांगळा माणूसही पर्वत चढून जातो, अशा परमानंद सागर प्रभू परमात्म्याच्या कृपेने सर्व काही शक्य आहे ह्याचा प्रत्यय मला आला आहे. वास्तविक मी कोणी सिद्धहस्त लेखक नव्हे किंवा कोणी विद्वान पंडित नव्हे. पण प्रभू परमात्म्याची कृपा झाली व त्याने माझ्या कडून श्री गुरू ग्रंथ साहिबचा अनुवाद करवून घेतला अशी माझी धारणा आहे.

जून २००२ पर्यंत मी श्री. गुरू ग्रंथ साहिब पाहिलाही नव्हता. त्याच्या विषयी मला एवढीच माहिती होती की शीख बांधव त्यास आपला गुरू मानतात. पुण्यात दि. ४ जुलै व ५ जुलै २००२ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या स्मृती शताब्दी निमित्त भरलेल्या सर्व धर्म परिषदेचे वेळी सर्व धर्मांचा अभ्यास करताना माझ्या असे लक्षात आले की अन्य सर्व धर्मांचे धर्मग्रंथ मराठीत अनुवादित झाले आहेत पण श्री गुरू ग्रंथ साहिब मात्र अद्याप कोणी मराठीत अनुवादित केलेला नाही. मी ही गोष्ट सरदार तारासिंघ गोरोवाडा यांच्या निदर्शनास आणली कारण सदर सर्व धर्म परिषदेत त्यांनी शीख धर्माचे प्रवक्ते म्हणून शीख धर्माची मांडणी केली होती

ऑक्टो. १७०८ मध्ये महाराष्ट्रातील नांदेड येथे 'श्री आदिग्रंथास' गुरू पदाचा मान प्राप्त होऊन त्यास 'आदि श्री गुरू ग्रंथ साहेब' असे नामाभिधान प्राप्त झाले. असे असूनही मराठी बांधव श्री गुरू ग्रंथ साहिब मधील मौलिक विचार धनापासून वंचित रहावेत ही गोष्ट मराठी माणूस म्हणून मला व महाराष्ट्रात रहाणारा शीख म्हणून स. तारासिंधजी यांना फार बोचली व आम्ही दोघांनी श्री गुरू ग्रंथ साहिब मराठीत अनुवादित करण्याचा संकल्प केला.

खरे तर संकल्प करणारे आम्ही कोण ? प्रत्यक्ष प्रभू परमात्म्याची 'वाहेगुरू'चीच तशी इच्छा असावी, म्हणून त्याने आम्हा दोघांस तशी प्रेरणा दिली असावी असे आम्हास वाटते. श्री. गुरू सिंघ सभा पुणे येथील ग्रंथी ग्यानी बलवंत सिंघजी यांचे आशीर्वाद प्राप्त झाले व आम्ही कामास लागलो.

प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यापूर्वी श्री गुरू ग्रंथ साहिबच्या मराठी अनुवादाच्या दृष्टीने पूर्वी कोणी काही प्रयत्न केले आहेत का याचा मागोवा घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. तेव्हा असे लक्षात आले की यापूर्वी आचार्य विनोबा भावे व मा. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ (भूतपूर्व राज्यपाल पंजाब) यांनी जपुजी साहिबचा मराठी अनुवाद केला आहे. तसेच श्रीरामपूर येथील एक शीख महिला डॉ. कमल कौर बतरा यांनी ही जपुजीचा मराठी अनुवाद केला आहे. पुणे येथील एक पत्रकार कै. प्रतिम सिंघ जुनेजा यांनी श्री गुरू ग्रंथ साहिब मधील भक्त नामदेवांच्या पदांचा 'नामा म्हणे त्रिलोचना' हा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला होता. पुण्याचेच एक सद्‌गृहस्थ सरदार ईश्वरसिंघ ठाकूर यांनी श्री गुरू ग्रंथ साहिब मधील श्री गुरू तेगबहादर यांच्या रचनांचा मराठी अनुवाद 'गुरू वाणी' ह्या नावाने प्रकाशित केला. ही सर्व पुस्तके आम्ही वाचली व आपणही संपूर्ण गुरू ग्रंथ साहिबच्या अनुवादापूर्वी त्यातील प्रमुख भागांचा मराठी अनुवाद करून तो प्रकाशित करावा, त्यास कसा प्रतिसाद मिळतो ते पाहून पुढे काय करावयाचे ते ठरवावे असा विचार केला. वर उल्लेखिलेल्या लेखकांना मनोमनी धन्यवाद देऊन व त्यांचे ऋण स्मरून आम्ही कामास लागलो.

सर्व प्रथम श्री गुरू ग्रंथ साहिबांची सुरवात ज्या काव्याने झाली आहे त्या 'जपु' ह्या काव्याचा मराठी अनुवाद 'गुरू नानकांची वाणी जपूजी साहिब' ह्या नावाने प्रकाशित केला. त्याचे प्रकाशन सेवा पंथी ग्यानी व जत्थेदार संत बाबा काहन सिंघजी यांच्या शुभ हस्ते श्री गुरू नानक दरबार गुरू द्वारा कॅम्प पुणे येथे श्री आदि ग्रंथाच्या चारशेव्या प्रकाश दिनी झाले. सदर पुस्तकास मराठी जनतेने उत्साहवर्धक प्रतिसाद दिला. त्यातून स्फूर्ती घेऊन आम्ही पुढे पाऊल टाकले.

त्यानंतर ऐक रे मना '(श्री गुरू तेगबहादूरजी यांची वाणी) 'नामा म्हणे' (भक्त नामदेवांची श्री गुरू ग्रंथ साहिबमधील ६१ पदे) ओअंकार व सिध गोसटी, (श्री गुरू नानकदेव यांची वाणी) सुखमनी साहिब (श्री गुरू अरजनदेव यांची वाणी) व म्हणे कबीर (श्री गुरू ग्रंथ साहिब मधील भक्त कबीरांची संपूर्ण वाणी) अशी एकूण सहा पुस्तके प्रकाशित करून मराठी जनतेत वितरित केली. ह्यापैकी 'सुखमनी साहिब' हे पुस्तक नांदेड येथे दि. ४ एप्रिल २००६ रोजी भरलेल्या संत समागमाचे वेळी पंचप्यारे यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आले. ह्या सर्व पुस्तकांच्या मिळून सुमारे पंचवीस हजार प्रती विनामूल्य वितरित करण्यात आल्या. ह्या पुस्तकांच्या प्रकाशनार्थ आमच्या मराठी व शीख बांधवांनी आम्हास आर्थिक सहाय्य केले. त्यामुळे ही पुस्तके आम्ही विनामूल्य वितरित करू शकलो. मराठी बांधवांनी आम्हास शेकडो पत्रे व फोन करून त्यांचे अभिप्राय कळवले व आम्हास अधिक लिहिण्यास प्रोत्साहित केले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

वर उल्लेखिलेली सहा पुस्तके मिळून श्री गुरू ग्रंथ साहिबची सुमारे दीडशे पाने म्हणजे एक दशांश भाग होतो. पण मराठी वाचकांच्या प्रोत्साहनामुळे व वरील पुस्तके लिहिण्याच्या अनुभवामुळे उत्साहित होऊन पूर्ण ग्रंथ आम्ही अनुवादित करू शकू असा आम्हास विश्वास वाटला. ही सुद्धा 'वाहेगुरू'ची, प्रभू परमात्म्याचीच कृपा मानून आम्ही संपूर्ण गुरू ग्रंथ साहिबच्या मराठी अनुवादाचे काम हाती घेतले. व ते ऑक्टोबर २००७ मध्ये पूर्ण ही केले. त्याच बरोबर श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये ज्या सहा गुरुंची वाणी संकलित केली आहे व ज्या भक्तांची वाणी संकलित केली आहे त्यापैकी प्रमुख भक्तांची चरित्रे ही आम्ही लिहिली आहेत. अनुवाद करताना प्रथम मूळ वाणी, (देवनगरी लिपित) अवघड पंजबी शब्दांचे मराठी अर्थ व त्यानंतर त्या वाणीचा मराठी भावार्थ अशी पद्धत अवलंबिली आहे. हे सर्व वाङ्मय सुमारे चार हजार पृष्ठांचे झाले आहे. व ते सात खंडात प्रसिद्ध करणार आहोत. त्यापैकी प्रथम खंड वाचकांच्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे.

अनुवाद करताना तो निर्दोष व्हावा व पदामधील भाव मराठी वाचकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचावा म्हणून खालील ग्रंथांचा आधार घेतला आहे. सदर ग्रंथकर्त्यांप्रती आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

१) श्री गुरू ग्रंथ साहिब हिंदी शब्दार्थ
पंजाबी युनिवर्सिटी, पब्लिकेशन ब्युरो, पटियाला (तीन खंड)

२) आदि श्री गुरू ग्रंथ साहिब (हिंदी अनुवादासहित नागरी लिप्यांतर)
अनुवादक डॉ. मनमोहन सहगल (चार खंड) भुवनवाणी ट्रस्ट प्रकाशन

३) श्री गुरू ग्रंथ साहिब (मूल पाठ एवं हिंदी अनुवाद) अनुवादक डॉ. जोध सिंह. द. सिख हैरीटेज पब्लिकेशन्स पटियाला (चार खंड)

४) श्री गुरू ग्रंथ साहिब कोश. ले. भाई वीर सिंघजी प्रकाशन (पंजाबी) सिंघ ब्रदर्स.

५) श्री गुरू ग्रंथ साहिबजी दर्शन निर्णय. ले / ग्यानी हरबन्ससिंघजी (पंजाबी) प्रकाशक गुरुवाणी सेवा प्रकाशन, पटियाला (चौदा खंड)

६) श्री गुरू ग्रंथ साहिब दरपण

एवढे करून ही काही न्यून राहिले असल्यास आम्ही वाचकांची क्षमा प्रार्थितो. वाचकांना आम्ही नम्र विनंती करतो की त्यांनी ते आमच्या नजरेस आणून दिल्यास पुढील आवृत्तीत त्याची दखल घेतली जाईल.

हे सर्व करत असताना आम्हास ज्या बंधु भगिनींनी सहाय्य केले त्यांचे आम्ही आभार मानतो.

ह्या सर्व लेखनाचे श्रेय आम्ही स्वत:कडे मुळीच घेऊ इच्छित नाही. त्या प्रभू परमात्म्याने आम्हास हाती धरून आमच्याकडून हे कार्य करवून घेतले आहे अशी आमची धारणा आहे.

आम्ही प्रभू कृपेस पात्र झालो ह्यातच आम्ही धन्यता मानतो व आमच्या जीवनाचे सार्थक झाले असे आम्ही समजतो व त्या प्रभू परमात्म्याच्या त्याचे चरणी ही कृती विनम्रपणे समर्पित करतो.

॥ हरी ओम् तत् सत् ॥

**– विनायक लिमये**

# श्री गुरु ग्रंथ साहिब जी - ग्रंथ परिचय

शीखांचा धर्म ग्रंथ श्री गुरू ग्रंथसाहिब हा जगातील असा एकमेव ग्रंथ आहे की ज्यास 'गुरूपद' प्राप्त झाले आहे. शीख बांधव ह्या ग्रंथास देहधारी गुरू मानतात.

मराठी माणसाला शिख माणूस माहीत आहे. त्याची उद्यमशीलता माहित आहे. त्यांनी गाजवलेले शौर्य माहीत आहे. आजही भारतीय सैन्य दलात शिख बांधव बजावत असलेली महत्त्वाची कामगिरी माहित आहे. देश, धर्म आणि भारतीय संस्कृतीच्या रक्षणा करता शिख गुरुंनी, त्यांच्या पुत्रांनी केलेल्या अत्युच्य बलिदानाबद्दल सर्व भारतीयांचा माथा त्यांच्यापुढे आदराने विनम्र होतो. पण हे सर्व करणाऱ्या शिख बांधवांचा मनोपिंड ज्यावर पोसला जातो त्या त्यांच्या धर्मग्रंथाबद्दल 'श्री गुरू ग्रंथ साहिब'बद्दल मात्र मराठी माणसाला फारच कमी माहिती आहे. ती माहिती व्हावी हा ह्या लेखाचा उद्देश आहे. ह्या पुढे आम्ही जो श्री गुरू ग्रंथासाहिबचा मराठी भावानुवाद सादर करणार आहोत तो समजण्यासाठी ह्या लेखनाचा उपयोग होईल.

हा ग्रंथ कसा सिद्ध झाला ? त्यासाठी कोणी कोणी कसे परिश्रम केले ? त्याचे स्वरूप कसे आहे ? रचना कशी आहे हे आपण तपशीलवार समजावून घेऊ या.

शिख बांधवांचे दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंधजी यांनी आपल्या परलोक गमनापूर्वी एक दोन दिवस जवळच्या सर्व शिखबंधूंना एकत्र केले व आपला अंतकाळ जवळ आल्याचे सांगून त्यांना दिलासा देऊन श्री आदि ग्रंथ साहिब पुढे ठेऊन म्हणाले, '**मेरा रूप ग्रंथजी जान। इसमें भेद कुछ नहीं जान।**' त्यानंतर त्यांनी श्री आदि ग्रंथ साहिबची गुरूगद्दीवर स्थापना केली. ग्रंथापुढे पाच पैसे व श्रीफल ठेऊन त्यास प्रदिक्षणा घातली व म्हणाले,

**''आगिआ भइ अकाल की तबे चलायो पंथ।**
**सब सिखनको हुकम है गुरू मानिओ ग्रंथ।।''**

त्या क्षणापासून देहधारी गुरूची परंपरा खंडित झाली व श्री आदिग्रंथास गुरू पद प्राप्त झाले व त्यास 'श्री गुरू ग्रंथ साहिब जी' हे नामाभिधान प्राप्त झाले.

## ग्रंथ संकलन व संपादन

श्री गुरू ग्रंथ साहिब हा १४३० पानांचा बृहत ग्रंथ असून त्यात ५८९४ पदे आहेत. श्री गुरू ग्रंथ साहिब मधील पदांना 'सबद' किंवा 'बाणी' असे म्हणतात. तसेच पानांना 'अंग' असे म्हणतात. कारण शिख बांधव श्रीगुरू ग्रंथ साहिब यास देह धारी गुरू मानतात व त्याच्या पानांना, देहाचे अवयव, म्हणून अंग असे संबोधतात.

श्री गरू ग्रंथ साहिब हा सर्व ग्रंथ पद्यमय आहे व ते भारतीय संस्कृतीस अनुरूपच आहे. अगदी वेद कालापासून तो ज्ञानेश्वरांपर्यंत सर्व संतांनी आपला अध्यात्मिक विचार जनतेपर्यंत पद्यरूपातच सांगितला आहे. त्याची मुख्य दोन कारणे दिसतात. एकतर त्या काळी मुद्रण कला ज्ञान नव्हती व दुसरे कारण असे की गद्यापेक्षा पद्य हे पाठ करण्यास, लक्षात ठेवण्यास सोपे. मनन चिंतनासही सोईचे. पण श्रीगुरू ग्रंथ साहिबचे खरे वैशिष्ट्य हे आहे की त्यातील बहुतांश पदे 'शबद' ही कोणत्याना कोणत्या रागात निबद्ध आहेत त्यामुळे कोणत्याही गुरू द्वारात होणारे 'शबद कीर्तन' ऐकणे हा एक अनोखा अनुभव आहे. ते ऐकता ऐकता ऐकणाऱ्याची भावसमाधी केव्हा व कशी लागून जाते ते कळत ही नाही.

श्री गुरू ग्रंथ साहिब हा कोणा एका शिख गुरूने लिहिलेला ग्रंथ नव्हे तर सहा शिख गुरूंनी वेळोवेळी केलेल्या उपदेशाचे एकत्र संकलन आहे. शिखांचे एकूण दहागुरू झाले. त्यापैकी पहिले पांच गुरू व नववे गुरू अशा सहाच गुरूंनी पद्यरचना केली व ती श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. श्री गुरू गोबिंद सिंघजी यांनी विपुल पद्य

रचना केली आहे पण ती स्वतंत्रपणे 'दशमग्रंथ' मध्ये संग्रहित केली आहे. पण श्री गुरू ग्रंथ सहिब मधील पान १४२९ वरील ५४ वा, श्री गुरू तेगबहाद्दरजी यांचे नावे ग्रंथीत असलेला श्लोक

**'बलु होआ बंधन छुटे सभु किछु होत उपाय।**

**नानक सभु किछु तुमरै हाथ मै तुम ही होत सहाइ ।।५४।।**

त्यांचा नसून तो दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंगजी यांचा आहे असे काहींचे म्हणणे आहे.

श्री गुरू ग्रंथ साहिबचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ह्या ग्रंथात शिखगुरुंबरोबर भारतातील श्री गुरू नानकांच्या पूर्वी उत्तर भारतात होऊन गेलेल्या अनेक संतांच्या रचनांचाही समावेश केलेला आहे. अशा रीतीने श्री गुरु ग्रंथसाहिब हा गुरू नानक पूर्वीपासून ते श्री तेग बहाद्दरजीपर्यंत चा ५०० वर्षांचा भारतातील भक्ती मार्गाचा ज्ञानकोशच आहे.

श्री गुरू नानक देवांनी आपल्या रचना लिहून ठेवल्या. पुढे श्री गुरू अंगद देवांना गुरूपदी स्थापित केल्यावर आपल्या रचनांचे बाडही श्रीनानकदेवांनी त्यांच्या कडे हस्तांतरीत केले. त्या बरोबरच इतर भक्तांच्या त्यांनी संकलित केलेल्या रचनाही हस्तांतरीत केल्या. हीच परंपरा पाचवे गुरू श्री गुरू अरजन देव ह्यांच्या पर्यंत चालत आली. श्री गुरू अरजन देव यांनी ह्या सर्वांचे एकत्रित संकलनाचे काम इ. स. १५९५ मध्ये सुरू केले व ते १६०४ मध्ये पूर्ण करून १ सप्टेंबर १६०४ रोजी त्याची अमृतसर मधील हरि मंदिरात श्रद्धेने भक्तिभावाने स्थापना केली. ह्या ग्रंथात त्यावेळी '**श्री आदि ग्रंथ**' किंवा '**पोथी साहेब**' असे म्हटले जात असे.

आदि ग्रंथाच्या संकलनाचे काम सोपे व सरळ मुळीच नव्हते. गुरुंची अस्सल पदे कोणती व बनावट कोणती ह्याचा शोध घेणे अवघड काम होते. गुरुंची सर्वच अस्सल पदे श्री गुरू अरजन देवाना प्राप्त झाली होती असे नाही. ती अन्यत्र विखुरलेली होती. ती अन्य लोकांकडून मिळवून त्यांची सत्यासत्यता पडताळून पाहणे हे काम ही फार अवघड होते. श्री गुरू अरजन देवांनी तेही काम अत्यंत कौशल्याने व चिकाटीने पार पाडले. काळाच्या ओघात काही पदात विकृतीही निर्माण झाली असण्याची शक्यता होती. त्याचाही शोध घेऊन ती शुद्ध स्वरूपात आणणे हेही तितकेच अवघड काम होते. हे सर्व काम अत्यंत परिश्रमपूर्वक व ज्या कुशलतेने श्री गुरू अरजन देवांनी केले ते पाहून श्री गुरू अरजन देवांपुढे आदराने नतमस्तक व्हावे असे वाटते.

श्री गुरू नानक देवांपासून ते श्री गुरू अरजन देवजी यांचे पर्यंत सर्व गुरूंनी एक प्रथा पाळली होती. प्रत्येकाने पद्यरचना केल्यावर पानाच्या अखेरीस आपली नाममुद्रा उठवली होती. त्यामुळे अस्सल व नक्कल ओळखणे काहीसे सोपे झाले असावे. ह्या ठिकाणी एक विशेष गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे. प्रत्येक गुरुने आपल्या पदाचा शेवट 'नानक सांगतात' ह्या शब्दांनी केला आहे. ह्याचे कारण म्हणजे त्यांची अशी दृढ श्रद्धा होती की नानकांची आत्मज्योतच त्यांच्या आत्मज्योतीत सामावलेली असून तीच त्यांचेकडून कार्य करून घेत आहे. श्री गुरू अरजनदेवांनी आदि ग्रंथाचे संकलनाचे वेळी कोणती रचना कोणा गुरू देवांची आहे हे समजावे म्हणून त्या पदा आधी 'महला' असा शब्द वापरला आहे व त्यापुढे अंक लिहिला आहे. ॥ म. १॥ ॥ म. २॥ ... याचा अर्थ. 'म. १' म्हणजे श्री गुरू नानकदेव 'म. २' म्हणजे श्री गुरू अंगद देव 'म. ३' म्हणजे श्री गुरू अमरदास 'म ४' म्हणजे श्री गुरू रामदास 'म. ५' म्हणजे श्री गुरू अरजन देव व 'म. ९'' म्हणजे श्री गुरू तेगबहादरजी. श्री गुरू नानकदेवांच्या संगतीत लहान पणापासून राहिलेले भाइ बालाजी (बुढाजी) या वृद्ध शिष्याचेही या कामी मोलाचे सहकार्य लाभले.

गुरूंच्या पदांची एक अस्सल प्रत बाबा मोहनजींकडे होती. त्याला मोहनबीड असे म्हणतात. ती मिळवण्यासाठी श्री गुरू अरजनदेवांनी भाई गुरूदास व बाबा बुढाजी ह्या दोन मातब्बर व्यक्तींना बाबा मोहन यांच्याकडे पाठवले पण त्यांना बाबा मोहन यांनी दाद दिली नाही. शेवटी श्री गुरू अरजन देवजी स्वत: मोहनजी यांचे कडे गेले व भल्या पहाटे त्यांच्या दारापुढे उभे राहून मोहन स्तुतीपर गीत म्हणू लागले. हे गीत द्वर्थी होते. त्याचा एक अर्थ प्रभू परमात्म्याच्या स्तुतीपर होता.

तर दुसरा बाबा मोहनजी यांची स्तुती करणारा होता. हे पद श्री गुरू ग्रंथसाहिब मध्ये पृष्ठ २४८ वर ग्रथित केले असून ते गउडी रागात गाइले जाते. ते गीत अत्यंत भावमधुर व अर्थ गर्भ आहे. त्या पदाच्या श्रवणाने बाबा मोहनजी अत्यंत प्रभावित व संतुष्ट झाले. त्यांनी आपल्या जवळचा गुरू वाणीचा संग्रह श्री गुरू अरजन देवजी यांचे हाती सुपूर्त केला. ह्या संग्रहास 'मोहनबीड' असे म्हणतात. त्याच प्रमाणे श्री गुरू अंगद देवजी यांचे दोन पुत्र दत्तू व दासू यांचेकडे असलेले श्री गुरू नानक देवजी व श्री गुरू अंगद देवजी ह्यांच्या रचनांचे संग्रह ही मिळवले. श्रीलंकेतही श्री गुरू नानक देवजी यांच्या पदाचा संग्रह आहे असे कळताच तेथेही त्यांनी आपल्या शिष्यांना पाठवले. अशा रीतीने जेथे जेथे शक्य होते तेथे तेथे शिष्यांना पाठवून वा स्वत: जाऊन श्री गुरू अरजन देवांनी रचना गोळा केल्या. 'आदि ग्रंथा'च्या संकलन कामी श्री गुरू अमरदासजी यांचे नातू श्री संतराम यांनी लिहून ठेवलेल्या व दोन खंडात ग्रथित केलेल्या पद्य संग्राहाचाही फार मोठा उपयोग झाला आहे. त्यात श्री गुरू नानकांच्या व श्री गुरू अंगददेवांच्या तसेच अन्य भक्तांच्या रचनांचाही समावेश आहे.

आदि ग्रंथासाठी गुरू वाणीच्या संकलनाचे काम सन १४९५ पासून सुरू झाले असले तरी प्रत्यक्ष ग्रंथ लेखनास १६०३ मध्ये प्रारंभ होऊन १६०४ मध्ये संपले. हे लेखन अमृतसर पासून २-३ किलो मिटर अंतरावर 'रामसर' तलावाच्या काठी असलेल्या बोरीच्या झाडाखाली चाले. आजही त्या ठिकाणी ती बोरीची झाडे व तेथील ग्रंथ लेखनाची जागा दाखवतात. ज्या प्रमाणे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनी सांगितला व तो सत्‌चितानंद बाबांनी लिहून घेतला त्याच प्रमाणे आदिग्रंथही श्री गुरू अरजन देवजी यांनी भाई गुरुदासांना सांगितला व तो त्यांनी लिहून घेतला. भाई गुरुदास ह्यांना संस्कृत भाषेचे व वेद वाङ्मयाचे चांगले ज्ञान होते. व्रज भाषेचेही ज्ञान होते. गुरू अंगददेवजी यांनी तत्कालिन प्रचलित असलेल्या लिपीत सुधारणा केली त्यास गुरूमुखी लिपी म्हणतात. त्याच लिपीत सारा ग्रंथ लिहिला गेला आहे.

श्री गुरू रामदास यांनी अमृतसर तलावाचे काम सुरू केले होते. ते श्री गुरू अरजन देव यांनी ते पूर्ण केले. त्या तलावात मधोमध एक मंदीर बांधले त्यास 'हरि मंदीर' असे म्हणतात. त्या मंदिरात मिती भाद्रपद शु. १ संवत १६६१ (१ सप्टेंबर १६०४) रोजी आदि ग्रंथाची उच्चासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. सदर ग्रंथाचे पठणाचे काम वयोवृद्ध नानकशिष्य भाई बुढाजी यांचेकडे सोपवण्यात आले. तेच 'आदि ग्रंथाचे' पहिले ग्रंथी. सदर ग्रंथात श्री गुरू नानक देव यांच्यापासून श्री गुरू अरजन देव यांच्यापर्यंतच्या पाच गुरूंच्या व उत्तर भारतातील काही संताच्या रचनांचा समावेश केला होता. पुढे शिखांचे दहावे गुरू श्री गुरू गोबिंद सिंघजी यांनी आपले पिता नववे गुरू श्री गुरू तेगबहादरजी यांच्या रचना समाविष्ट करून आदिग्रंथाची सुधारित अवृत्ती सिद्ध केली. हे कार्य त्यांनी दमदमा साहेब ह्या गावी केले म्हणून त्यास 'दमदमी बीड' असे म्हणतात. बाबा दीप सिंधजी यांनी श्री गुरू गोविंद सिंधजी यांचे आज्ञेप्रमाणे त्याच्या चार प्रती करून त्या हरिमंदिर (अमृतसर), श्री आनंद साहिब. श्री हुजूर साहिब (नांदेड) व श्री पटणा साहिब ह्या गुरूद्वारात पाठवून दिल्या. एक प्रत ते आपल्या बरोबर नांदेड येथे घेऊन आले व आपल्या अंतकाली त्याची गुरूपदी स्थापना केली. तेव्हा पासून त्यास 'दशम ग्रंथ' असे म्हणतात.

ह्या ग्रंथात शिखांचे सहा गुरू श्री गुरू नानक देव, गुरू अंगद देव, गुरू अमरदास, गुरू रामदास, गुरू अरजन देव व गुरू तेगबहाद्दर जी यांच्या रचनांबरोबरच भारतातील मध्ययुगीन संतांची वाणीही ग्रथित केली आहे. त्यांची नावे अशी – श्री संत कबीरजी, शेख फरीदजी, संत नामदेवजी, संत रविदासजी, संत त्रिलोचनजी, संत भीखनजी, संत जयदेवजी, संत सधनाजी, संत रामानंदजी, संत सूरदासजी, संत धन्नाजी, संत वेणीजी, संत पीपाजी व संत परमानंदजी.

शिख संप्रदायातील चार गुरुशिष्यांची-भाई मरदाना, बाबा सुंदरजी, भाई संताजी व भाई बलवंडजी यांचीही काही पदे ग्रंथात समाविष्ट केली आहेत, त्याच बरोबर कलसहारजी, नळजी, भलजी, सलजी, बलजी, जालपजी, कीरतजी, भिखाजी, मथुराजी, गयंदजी, हरिवंसजी, ह्या भाटांचीही वाणीही ग्रंथित केली आहे.

वर उल्लेखिलेली सर्व मंडळी समाजातील सर्व वर्णांची, वर्गांची, जातींची प्रतिनिधी स्वरूप आहेत.

श्री गुरूग्रंथ साहिबमध्ये ग्रंथित केलेली बहुतांश पदे कोणत्याना कोणत्या रागात निबद्ध केलेली आहेत. ते राग असे - राग श्री, माझ, गउड़ी (गौरी) आसा, आसावरी, गुजरी, देवगंधार, बिहागडा (विहाग) वडहंस, सोरठ, धनासरी (धनश्री) जैतसरि (जैतश्री) टोडी (तोडी) बैराड़ी तिलंग, सुही, बिलावल, गौड, रामकली, मालगौडा, नटनारायण मारू, तुखार, (तुषार), केदार, भैरव, वसंत, सारंग, मल्हार, कानडा, कल्याण, प्रभात, जैजावंती (जय जयवंती). ह्या शिवाय काही मिश्र राग आहेत. जसे गउडी दीपकी गउडी-काफी, आसा-काफी, तिलंग-काफी, सुही-काफी, सुही-ललित, बिलावल - गोंड, मारू-काफी, वसंतु - हिंडोल कलिआन-भोपाली. प्रभाति-विभास आसा-आसावरी.

काही पदे ही कोणत्याही विशिष्ट रागात निबद्ध केलेली नाहीत उदा. जपू, गाथा, चउबोले (म.५) फुनहे (म.६) सलोक, सवैये, मुंदावणी, रागमाला.

श्री गुरू ग्रंथातील पदांची मांडणीही वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रंथाची सुरुवात मूल मंत्राने झाली आहे. त्यानंतर जपुवाणी ही वाणी येते. ही वाणी ग्रंथात पुढे येणाऱ्या विचारांचे सार आहे. त्यानंतर 'सोदर' हे प्रभू परमात्म्याच्या दरबाराचे, तर सो पुरखु हे परमेश्वराचे वर्णन करणारे व सोहिला हे परमेश्वराची स्तुती करणारे अशी तीन काव्ये आहेत. त्यानंतर रागानुसार पदे दिली आहेत. प्रत्येक रागात प्रथम गुरुंची वाणी गुरू १ ते गुरू ९ ह्या क्रमाने दिली आहेत. (महला १ किंवा म.१ ही श्री गुरू नानकांची, महला २ किंवा म.२ म्हणजे श्री गुरू अंगद देवांची अशा क्रमाने म. ९ श्री गुरू तेगबहादरजी यांची वाणी) पुढे भक्तांची वाणी व नंतर भट्टांची वाणी दिली आहे. व शेवटी मुंदावणी हे समारोपादाखल लिहिलेले पद व सर्वात शेवटी परिशिष्ट वाटावे असे रागमाला हे पद दिले आहे.

## श्री गुरू ग्रंथसाहिबची भाषा

श्री गुरू नानकदेव यांनी आपल्या जीवनात सुमारे २४ वर्षे संपूर्ण भारत, तिबेट, श्रीलंका, व अफगाणिस्थान, अरबस्थान इराण, इराक, तुर्कस्थान इतका विस्तृत प्रवास केल्याने त्यांच्या रचनात, तसेच श्री गुरू ग्रंथात मध्य युगीन भक्तांच्या रचनांच्या समावेश केल्याने त्यात भारतातील तत्कालीन पंजाबी, साधुकडी, प्राकृत, अपभ्रंश, ब्रज, अवधी, गुजराथी, मराठी बंगाली तसेच मुस्लीम देशातील अरबी, फारशी आदी भाषांचे प्रतिंबिंब पडलेले दिसते. त्यामुळे श्री गुरू ग्रंथ साहिब हा तत्कालीन भाषांचाही संग्रह आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

आणखी असेही दिसून येईल की श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये, शिख गुरूंबरोबर भक्त जयदेवजी (सन ११७०) शेख फरीदजी (११७३) पासून भक्त भीखनजी (सन १५७४) म्हणजे जवळ जवळ ५०० वर्षात होऊन गेलेल्या भक्तांची वाणी ग्रंथीत केली आहे. ह्यात सर्व जाती धर्मांच्या भक्ताच्या समावेश आहे. ह्या शिवाय अकरा भाटांची व चार गुरू शिष्यांची पदे समाविष्ट आहेत. ह्या सर्वांना शिख समाजात गुरूं इतकाच सन्मान दिला जातो. हे शिख बांधवांच्या विशाल हृदयाचे परिचायक आहे.

## आंतरिक रचना

श्री गुरू ग्रंथ साहिबची रचना तीन भागात केलेली दिसते. ते असे –

१) प्रारंभिक वाणी  २) रागात निबद्ध वाणी  ३) रागा बाहेरील वाणी

**१) प्रारंभिक वाणी –** ह्यात जपु, सोदरु, सुणिवडा, सोपुरखु, सोहिला यांचा अंतर्भाव होतो. ह्यापैकी जपु, सोदरु व सोहिला ह्या श्री गुरू नानक देवांच्या रचना आहेत. व त्या शिख बांधवांच्या रोजच्या पठणात असतात. ह्यापैकी 'जपु' ही अत्यंत महत्त्वाची वाणी आहे. ह्यात नाम जपाचे महत्त्व वर्णन केले असून ईश्वर प्राप्तीचा तो सोपान म्हणून गणला जातो. ही वाणी हे जणू श्री गुरू ग्रंथ साहिबचे सार आहे. सोदरु ह्या काव्यात प्रभू दरबाराचे कल्पनारम्य वर्णन आहे. तर सोहिला ह्या

वाणीत प्रभू परमात्म्याची स्तुती केली आहे. सोपुरखू ही चौथे गुरू श्री गुरू रामदास यांची रचना असून त्यात प्रभू परमात्म्याचे वर्णन केले आहे.

**२) रागबद्ध वाणी –** ह्यातील वाणी ३१ राग व १२ मिश्र रागात निबद्ध आहेत. प्रत्येक रागात प्रथम गुरूंची वाणी क्रमाने १ ते ५ व ९ अशी दिली आहे. त्यानंतर अष्ट पदींचा क्रम येतो. ह्यातही परत गुरू १ ते ५ व ९ अशी क्रमवारी येते. त्यानंतर स्फुट काव्ये, वारा व विशेष रचना गुरूच्या क्रमाने दिल्या आहेत. त्यानंतर भक्तांची वाणी व इतर भाट, शिख भक्तांची वाणी येते.

**३) रागा बाहेरील वाणी –** ह्यात सलोक, सहसक्रिती, गाथा, फुनहे, चउबोले, कबिरांचे श्लोक, शेख फरीद यांचे श्लोक, सवये, श्रीमुख वाक्य. सलोक वाराके वधीक, श्री गुरू तेग बहाद्दरजी यांचे श्लोक, व अखेर मूंदावणी व रागमाला असा क्रम आहे.

**पदाचा क्रमांक –** श्री गुरू अरजन देवांनी रागातील पदांना प्रत्येक पद ग्रंथात समाविष्ट करण्यापूर्वी क्रमांक दिले आहेत. उदा. श्री गुरू ग्रंथ साहिब पृष्ठ २६ वर ।।४।।३३।। असा क्रमांक आहे. त्याचा अर्थ असा की श्री रागातील ही चौपदी असून श्री गुरू नानक देवांचे श्री रागातील ३३ वे पद आहे. पृष्ठ क्र. ४२ वर ।।४।।३३।।३१।।६।।७०।। असा क्र. आहे. त्याचा अर्थ असा.

४ - चौपदी

३३ - पहिल्या गुरूचे सबद (पद)

३१ - तिसऱ्या गुरूचे सबद

६ - चौथ्या गुरूचे सबद

७० - एकूण सबद (जोड)

ह्यामुळे गुरूच्या पदात वा क्रमात कोणाताही बदल कोणी करू शकला नाही. त्यामुळे श्री गुरू ग्रंथ साहिब ४०० वर्षांपूर्वी जसा होता तसाच राहिला आहे.

**रहाउ –** श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये अनेक ठिकाणी पदाचे सुरवातीस वा मधे।।रहाउ।। असा शब्द येतो. रहाउ म्हणजे थांबा. 'रहाउ त्या पदाचा मुख्य विचार असतो. म्हणून तेथे थांबून तो विचार नीट समजून घ्या असे 'रहाउ' शब्द सुचवतो. ते पद त्या विचाराचा विस्तार असतो.

**वर्गवारी –** श्री गुरू ग्रंथसाहिबमधील पदांची वर्गवारी त्या पदातील चरणांवरून करता येईल ती अशी.

एक तुका – एक चरण वाले पद

दुतुका – दोन चरण वाले पद

तितुका – तीन चरण वाले पद

चौतुका – ह्यात चौपदी असे ही म्हणतात. ह्यात चार चरण असतात.

पंच पदा – ह्यात पाच चरण असतात.

छे पदा – ह्यात सहा चरण किंवा सहा कडवी किंवा आठ कडवी असतात.

असटपदी – ह्यात आठ चरण असतात.

सोलहे – ह्यात सोळा कडवी असतात. पण हे बंधन नेहमी पाळले गेले आहे असे दिसत नाही. कडव्यांची संख्या कधी पंधरा, सतरा वा एकवीसही आढळते. श्री गुरू ग्रंथसाहिबमध्ये श्री गुरू नानक देवांची बावीस, श्री गुरू अमरदासजी

यांची चौवीस, श्री गुरू रामदासजी यांची दोन व श्री अरजन देव यांची चौदा अशी एकूण बासष्ट सोलहे आहेत.

**काव्य प्रकार –** श्रीगुरू ग्रंथ साहिबमध्ये अनेक काव्य प्रकार आढळून येतात ते असे. १) श्लोक, २) अंजुलीया, ३) छंत, ४) अलहुणीआ म्हणजे निरोपाचे अभंग, ५) बिरहडे (विरह गीत.) ६) पॅटी – म्हणजे पट्टी – हा काव्य प्रकार फारसी भाषेतून आलेला आहे. पूर्वी लाकडाच्या फळीवर धुळाक्षरे गिरवीत, त्यास धूळपाटी म्हणत. राग आसामध्ये श्री गुरू ग्रंथ साहिब पान ४३२ श्री गुरू नानक देव यांचे 'पटी लिखी' हे पद आहे. ते त्यांनी वयाच्या सातव्या वर्षी रचलेले पहिले काव्य आहे असे म्हणतात. ह्या प्रकारस बावन अखरी असे ही म्हणतात. अशाच रचना श्री गुरू अमरदासजी (पान ४३४) व भक्त कबीर (पान ३४०) यांनी केल्या आहेत व त्या श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत.

**७) बार माहि –** ह्यात ऋतु चक्राप्रमाणे प्रत्येक महिन्यातील वातावरणाचे वर्णन करून त्यातून प्रभुभक्तीची प्रेरणा दिली आहे. अशा तऱ्हेच्या दोन रचना श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. एक श्री गुरू अरजन देवजी यांची माझ रागातली (पान १३३) व दुसरी श्री गुरू नानक यांची तुखारी रागातली (पान ११०७)

**८) थिति –** ह्या काव्य प्रकारात चांद्रमासातील सोळा तिथींचे वर्णन करून प्रत्येक तिथीचा अध्यात्मिक अर्थ देऊन प्रभुभक्तीचा संदेश दिला आहे.

**९) सतवार –** ह्या काव्य प्रकारात प्रत्येक वाराचे अध्यात्मिक महत्व सांगून प्रभुभक्तीची प्रेरणा दिली आहे.

**१०) दिन रैणी –** दिवस व रात्र यांच्या प्रत्येक प्रहराचे अध्यात्मिक महत्त्व सांगून प्रभुभक्तीची प्रेरणा दिली आहे.

बारामाहि, थिति, दिनरैणि, ह्या काव्यातून कोणताही क्षण, कोणताही दिवस, महिना प्रभू भक्तीस शुभच आहे. शुभ-अशुभ मुहूर्त शोधण्याची गरजच नाही. असा संदेश दिला आहे. शिख धर्माचे हे एक वैशिष्ट्य आहे की लग्न, वा अन्य कोणत्याही शुभ कार्यासाठी मुहूर्त पहात नाहीत. आपल्या सोयीने कोणत्याही दिवशी कोणत्याही वेळी कार्य संपन्न होते.

**११) वार –** हा काव्य प्रकार पंजाब, राजस्थान भागात फारच लोकप्रिय प्रकार आहे. ह्यात वीरांच्या शौर्याचे वर्णन केलेले असते. महाराष्ट्रातील पोवाड्यासारखा हा प्रकार आहे. पण श्री गुरू ग्रंथ साहिबमधील वारांमध्ये प्रभू परमात्म्याच्या शौर्याचे, गुणांचे वर्णन केले आहे. श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये एकूण २२ 'वार' आहेत. त्यांचे विवरण खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री गुरू नानक | – | १) माझ की वार | २) आसा की वार | ३) मलार की वार |
| श्री गुरू अमरदासजी | – | ४) गुजरी की वार | ५) सुही की वार | ६) मारू की वार |
| | | ७) रामकली की वार | | |
| श्री गुरू रामदासजी | – | ८) श्री राग की वार | ९) गउडी की वार | १०) बिहागडे की वार |
| | | ११) वड हंस की वार | १२) सोरठ की वार | १३) बिलावल की वार |
| | | १४) सारंग की वार | १५) कानडा की वार | |
| श्री गुरू अरजन देवजी | – | १६) गउडी की वार | १७) गुजरी की वार | १८) जैतसरी की वार |
| | | १९) रामकली की वार | २०) मारू की वार | २१) वसंत की वार |
| राय बलबंड व सत्ताडूम | – | २२) रामकली की वार. | | |

ह्या बावीस वारांपैकी – श्री गुरू नानक देव रचित 'आसा दी वार' फार प्रसिद्ध आहे व ही रचना शिख बांधवांच्या नित्य पठणात असते.

## श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये काही महत्त्वाच्या रचना

**१) जपुजी –** हे काव्य श्री गुरू नानक देवांनी रचलेले असून त्याने श्री गुरू ग्रंथ साहिबचा प्रारंभ झाला आहे. त्यात नाम जपाचे महत्त्व विषद केले असून प्रभू प्राप्तीच्या अडतीस पायऱ्यांचा सोपान जीवास दिला आहे. त्यात प्रश्न उपस्थित केला आहे. ''**किव सचिआरा होईऐ, किव कूड़ै तुटै पालि ।।**'' अर्थ असा की आम्ही सत्यानुगामी कसे होऊ ? आमचे भोवती असलेली ही मोहमाया रूपी असत्याची भिंत कशी तुटेल ? त्यास उत्तर देताना श्री गुरू नानक देव सांगतात, ''**हुकमि रजाई चलणा नानक लिखिआ नालि ।।**'' प्रभू परमात्म्याच्या आज्ञेचा अंत:करण पूर्वक स्वीकार करून त्याप्रमाणे आचरण करावे. पुढील सारा श्री गुरू ग्रंथ साहिब ह्या विचाराचा विस्तार आहे. शिख बांधवांच्या नित्य पठणातील हे काव्य आहे.

**२) सोदर –** श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये ही रचना जपूजीच्या पउडी क्र. २७ मध्ये आली आहे. (पृष्ठ क्र. ६) पुढे पृष्ठ क्र. ८ ते १० हीच रचना स्वतंत्रपणे अधिक विस्तार पूर्वक दिली आहे. पुढे पान ३४७ वर आसा रागाच्या सुरुवातीस ही रचना आली आहे. त्यावरून त्याचे महत्त्व लक्षात यावे. ह्या काव्यात प्रभू दरबाराचे अत्यंत सुंदर वर्णन असून प्रभुद्वारी भूलोकातील-स्वर्ग लोकांतील ज्येष्ठ श्रेष्ठ व्यक्ती, देव, देवता, गंधर्व, यक्ष, किन्नर, ऋषी मुनी व संत महात्मे प्रभू परमात्म्याचे गुणगान गात आहेत, त्याचे अत्यंत रोचक वर्णन केले आहे. ते वाचताना वाचकही प्रभू नामात तल्लीन होऊन जातात.

**३) सोहिला –** हे श्री गुरू नानकांचे गौडी दिपकी रागातील पद आहे. ते श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ १२ वर अंकित केले आहे. ह्यात प्रभू परमात्म्याची स्तुती केली असून हे काव्य रात्री झोपण्यापूर्वी म्हणण्याचा शिख बांधवांचा प्रघात आहे, ह्या रचनेचा काही भाग श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये पृष्ठ १५७ वर अंकित केला आहे.

**४) सुखमनी –** ही श्री गुरू अरजनदेव यांची रचना असून ती श्री गुरू ग्रंथ साहिबमधली अत्यंत महत्त्वपूर्ण रचना गणली जाते. सर्वच जीव सुख प्राप्तीसाठी प्रयत्न करत असतात. पण खरे सुख म्हणजे काय हे त्यांना माहित नसते. त्यांची झेप भौतिक सुखापुरतीच मर्यादित असते. हे सुख नश्वर असते. त्यामुळे अशा सुखाच्या मागे धावणाऱ्यास अखेर दु:खच भोगावे लागते. आत्मिक सुख हेच खरे शाश्वत सुख आहे असे सांगून ते कसे प्राप्त करावे हे या काव्यात सांगितले आहे. हे काव्य श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ क्र. २६२ ते पृष्ठ क्र. २९६ वर अंकित केले असून ते राग गौडी मध्ये निबद्ध आहे. हे एक प्रदीर्घ काव्य असून त्यात चौवीस अष्टपदी आहेत. प्रत्येक अष्टपदीच्या सुरवातीस एक श्लोक दिलेला असून पुढील अष्टपदी हा त्याचा विस्तर आहे. ह्यात नाम जपाचे, संत संगाचे महत्व वर्णन केले आहे. ब्रह्म ज्ञानाची महती वर्णन केली आहे. संत जनांची निंदा करणाऱ्याची निर्भत्सना केली आहे.

**५) आसा की वार –** श्री गुरू नानक देवांची ही रचना असून ती श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये पृष्ठ क्र. ४६२ ते ४७५ येथे अंकित केली गेली आहे. ती राग आसा मध्ये निबद्ध केली आहे. ह्या रचनेत नंतर श्री गुरू अरजन देवांनी श्री गुरू अंगद देवांच्या पंधरा श्लोकांचा समावेश केला आहे. आसा की वार मध्ये एकूण छत्तीस पउड्या व एकूणसाठ श्लोक आहेत. ही वाणी प्रत्येक गुरुद्वारात रोज सकाळी गायली जाते. ही वाणी प्रत्येक जीवास आपले मूळ स्वरूप जाणून घेण्याची शिकवण देते. ह्या वाणीत गुरुमुख साधकाच्या अध्यात्मिक उन्नतीच्या वाटेत येणारे अडथळे, गुरुमुख व मनमुख यांच्यातील वैचारिक संघर्ष व त्यात शेवटी सत्यानुगामी गुरुमुख साधकाचा होणारा विजय ह्याचे वर्णन केले आहे.

**६) आनंद साहिब –** हे श्री गुरू अमरदासजी यांचे काव्य असून ते श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ क्र. ९१७ ते पृष्ठ क्र. ९२२ वर अंकित केले असून ते रामकली रागात निबद्ध आहे. हे काव्य प्रत्येक मंगल आनंददायक घटनेचे वेळी म्हटले जाते, ही रचना श्री गुरू अमरदासजी यांची असून त्यांनी ती आपले नातू आनंद ह्याच्या जन्माच्या वेळी लिहिली असे सांगतात. खरा आनंद म्हणजे काय ह्याचे विवरण ह्या काव्यात केले आहे. गुरूजी सांगतात की सतगुरू कडून ज्ञान प्राप्त

झाल्यावर मोहमायेचे पाश तुटतात व नाम भक्तीचे रहस्य समजते आणि खरा आनंद प्राप्त होतो.

**७) आनंद कारज –** ही श्री गुरू रामदास यांची रचना असून जी श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये पृष्ठ क्र. ७७३ व ७७४ वर अंकित केली आहे. ती सुही रागात निबद्ध असून ती छंत ह्या काव्य प्रकारात मोडते. ही रचना विवाह समयी गायली जाते. ह्यातील चार छंत म्हटले जातात. प्रत्येक छंताचे वेळी वधूवर श्री गुरू ग्रंथ साहिबला प्रदक्षिणा घालतास. त्याला फेरे असे म्हणतात. हा प्रकार आपल्या सप्तपदी सारखाच आहे. ह्यात वधू ही जीवात्मा व वर हा परमात्मा कल्पिलेला आहे व विवाह हा जीवात्मा व परमात्मा यांचे मिलन होय असे समजले जाते व त्याचेच वर्णन ह्या चार छंतात केलेले आहे.

**सद –** ही रचना रामकली रागात निबद्ध आहे व ती श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये पृष्ठ ९२३ वर अंकित केली आहे. ही रचना श्री गुरू अमरदासजींची असून ती त्यांनी आपल्या अंतकाळी उच्चारली व ती बाबा सुंदजींवी यांनी लिहून घेतली असे सांगितले जाते. 'सद' ह्याचा अर्थ बोलावणे, प्रभु परमात्म्याचे बोलावणे म्हणजेच मृत्यू. वास्तविक जीव ह्या जगात फार थोड्या काळाकरता आलेला असतो. त्याचे खरे व शाश्वत स्थान म्हणजे प्रभू परमात्म्याचे घर. म्हणून मृत्यू ही दु:खद घटना नसून ती एक आनंदाची घटना आहे असे सांगितले आहे. संत श्रेष्ठ तुकाराम महाराजही मृत्यू हा 'आनंद सोहळा' आहे असे सांगतात. तोच विचार श्री गुरू अमरदासांनी ह्या काव्यात सांगितला आहे.

**सिध गोसटी –** ही श्री गुरू नानक देवांची रचना असून ती रामकली रागात निबद्ध आहे. व ती श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये पृष्ठ क्र. ९३८ ते ९४६ वर अंकित केली गेली आहे. श्री गुरू नानक देवजी आपल्या उदासीच्या काळात पंजाबच्या पहाडी मुलखात तसेच हिमालय पर्वतराजीत यात्रा करत असताना त्यांनी अनेक योग्यांशी तत्व चर्चा केली आहे. त्या काळी योगमार्गाचा खूप बोलबाला होता. ह्या चर्चेत योग्यांनी योगमार्ग श्रेष्ठ आहे हे श्री गुरू नानक देवांना पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे, तर श्री गुरू नानक देव योग्यांना प्रभू प्राप्तीसाठी घरदार सोडण्याची वा देह कष्टविण्याची गरज नाही, संसारात राहून, अनासक्त होऊन अहंकाराचा त्याग करून पूर्ण श्रद्धेने प्रभूनामाचे स्मरण केल्याने तो प्राप्त होतो असे सांगातात.

**ओअंकार –** ही श्री गुरू नानक देवांची रचना असून ती रामकली रागात निबद्ध केली असून श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये ती पृष्ठ क्र. ९२९ ते पृष्ठ क्र. ९३८ वर अंकित केली गेली आहे. श्री गुरू नानक देव आपल्या उदासीच्या काळात फिरत-फिरत नर्मदेच्या तटी असलेल्या श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे गेले. तेथे एक पंडित आपल्या विद्यार्थ्यांना मुळाक्षरे शिकवत होता. श्री गुरू नानकांनी प्रत्येक मुळाक्षरातील अध्यात्मिक अर्थ त्यास समजाऊन दिला व विद्यार्थ्यांना प्रथम पासून अध्यात्मिकतेचे धडे देण्यास सांगितले.

**सलोक –** श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये सलोक (श्लोक) सर्वत्र विखुरलेले आहेत. वार रचनेत ते विशेषत्वाने आढळतात. पण त्या शिवाय श्री गुरू ग्रंथ साहिबच्या अखेरीस भक्त कबिरांचे श्लोक, शेख फरीद यांचे श्लोक, श्री गुरू तेग बहाद्दरजींचे यांचे श्लोक अपेक्षित असून ते श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये पृष्ठ क्र. १४२६ ते पृष्ठ क्र. १४२९ वर अंकित केले गेले आहेत. श्री गुरू तेगबहादय यांच्या श्लोकात मनाला उपदेश केला आहे. हे वाचताना मराठी मनाला श्री समर्थ रामदासांच्या मनाच्या श्लोकांची आठवण होते.

**श्री गुरुग्रंथसाहिब मधील पदांचे रचनाकार, त्यांची अनुषंगिक माहिती व त्यांनी रचलेल्या पदांची संख्या दर्शविणारी तालिका**

| क्र. | नाव | प्रदेश | वर्ण | काळ | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | श्री गुरुग्रंथातील एकूण पदसंख्या | | | | ५८९४ | ५८९४ |
| | **गुरुंची पदे** | | | | | |
| १) | श्री गुरू नानकदेव | पंजाब | क्षत्रिय | १४६९ ते १५३९ | ९७४ | |
| २) | श्री गुरू अंगददेव | पंजाब | क्षत्रिय | १५३९ ते १५५२ | ६२ | |
| ३) | श्री गुरू अमरदास | पंजाब | क्षत्रिय | १५५२ ते १५७४ | ९०७ | |
| ४) | श्री गुरू रामदास | पंजाब | क्षत्रिय | १५७४ ते १५८१ | ६७९ | |
| ५) | श्री गुरू अरजनदेव | पंजाब | क्षत्रिय | १५८१ ते १६०६ | २२१८ | |
| ६) | श्री गुरू तेगबहाद्दर | पंजाब | क्षत्रिय | १६६४ ते १६७५ | ११६ | |
| | **गुरूंची एकूण पदे** | | | | | **४९५६** |
| | **भक्तांची पदे** | | | | | |
| ७) | भक्त कबीर | उत्तर प्रदेश | विणकर | १३९८ ते १५०८ | ५४१ | |
| ८) | भक्त शेख फरीद | पंजाब | मुसलमान | ११७३ ते १२६६ | १३४ | |
| ९) | भक्त नामदेव | महाराष्ट्र | शिंपी | १२७० ते १३५० | ६१ | |
| १०) | भक्त रविदास | उत्तर प्रदेश | चांभार | १३८४ ते १५१४ | ४० | |
| ११) | भक्त त्रिलोचन | महाराष्ट्र | ब्राह्मण | १२६७ ते १३३५ | ४ | |
| १२) | भक्त वेणी | बिहार | ब्राह्मण | | ५ | |
| १३) | भक्त धन्ना | राजस्थान | जाट | १४१५ ते | ४ | |
| १४) | भक्त जयदेव | बंगाल | ब्राह्मण | ११७० ते | २ | |
| १५) | भक्त भिकन | उत्तर प्रदेश | मुसलमान | ते १५७४ | २ | |
| १६) | भक्त सैण | मध्य प्रदेश | न्हावी | | १ | |
| १७) | भक्त पीपा | गुजराथ | ब्राह्मण | १४२५ ते | १ | |
| १८) | भक्त सघना | सिंध | कसाई | | १ | |
| १९) | भक्त रामानंद | उत्तर प्रदेश | ब्राह्मण | १२९९ ते १४१० | १ | |
| २०) | भक्त परमानंद | महाराष्ट्र | ब्राह्मण | १४८३ ते १५९३ | १ | |
| २१) | भक्त सूरदास | उत्तर प्रदेश | ब्राह्मण | १४७८ ते | १ ओळ | |
| | **भक्तांची एकूण पदे** | | | | | **७९८** |

| क्र. | नाव | प्रदेश | वर्ण | काळ | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | **शिष्यांची पदे** | | | | | |
| २२) | सुंदरजी | पंजाब | क्षत्रिय | | ६ | |
| २३) | मरदाना | पंजाब | मुसलमान | १४५९ ते १५३४ | ३ | |
| २४) | सत्ता | पंजाब | डोंब | | ५ | |
| २५) | बलवंड राय | पंजाब | भाट | | ५ | |
| | **शिष्यांची एकूण पदे** | | | | | **१७** |
| | **भटांची वाणी** | | | | | |
| १) | भट कलसहार | | भाट | | सवैये ५४ | |
| २) | भट जाल्हप | | भाट | | सवैये ०५ | |
| ३) | भट कीरत | | भाट | | सवैये ०८ | |
| ४) | भट भीखा | | भाट | | सवैये ०२ | |
| ५) | भट सल्ह | | भाट | | सवैये ०३ | |
| ६) | भट भल्ह | | भाट | | सवैये ०१ | |
| ७) | भट नल्ह | | भाट | | सवैये १६ | |
| ८) | भट गयंद | | भाट | | सवैये १३ | |
| ९) | भट मथरा | | भाट | | सवैये १४ | |
| १०) | भट बल्ह | | भाट | | सवैये ०५ | |
| ११) | भट हरबसं | | भाट | | सवैये ०२ | |
| | एकूण पदे (भटांची) | | | | | १२३ |
| | **एकूण पदे** | | | | | **५८९४** |

वाचकहो, श्री गुरू ग्रंथ साहिबचा हा परिचय आपणास श्री गुरू ग्रंथ साहिबचा मराठी अनुवाद वाचताना व समजाऊन घेताना उपयोगी पडावा म्हणून हे पाथेय.

**।।हरी ओम तत्सत्।।**

**– विनायक लिमये**

**टीप –** हा लेख लिहितांना डॉ. कमलकौर बतरा यांच्या टिपणांचा फार उपयोग झाला. आम्ही त्यांचे फार आभारी आहोत.

# वाचन सुरू करण्यापूर्वी
# वाचकांस सूचना

वाचक हो,

श्री गुरु ग्रंथ साहिब हा ग्रंथ पंजाबी भाषेत व गुरुमुखी लिपीत लिहिलेला आहे. मराठी वाचकास गुरुमुखी लिपीचे ज्ञान नसल्याने मूळ ग्रंथ वाचता येत नाही म्हणून आम्ही तो देवनागरी लिपीत लिप्यांतर करून छापला आहे. त्यामुळे मराठी वाचकास तो वाचणे सुलभ होईल असे वाटते.

पंजाबी भाषेत ळ, क्ष व ज्ञ ही अक्षरे नाहीत 'ळ' ऐवजी 'ल' लिहितात. क्ष ऐवजी ख लिहितात तर 'ज्ञ' ऐवजी 'गिय' लिहितात उदा. आज्ञा शब्द 'अगिया' असा लिहितात.

पंजाबी भाषेत जोडाक्षरे नसतात. 'नमस्कार' हा शब्द 'नमसकार', 'बक्षीस' हा 'बखसीस' असा लिहितात. 'विद्या' हा शब्द 'विदिआ' असा लिहितात.

पंजाबी भाषेत शब्दाच्या शेवटच्या अक्षरास 'इ' कार अथवा 'उ' कार लागला असेल तर त्याचा उच्चार करत नाहीत. उदा- 'जपु' ह्याचा उच्चार 'जप' असा करतात 'जुगादि' ह्याचा उच्चार 'जुगाद' असा करतात.

पंजाबी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शब्दाच्या आधी 'अ' 'स' ही अक्षरे लावणे. त्यामुळे मात्र मराठी वाचकाच्या मनात गोंधळ निर्माण होणे शक्य आहे. उदा. 'असथिरु' म्हणजे मराठी वाचकास अस्थिर असे वाटेल, पण तो खरा 'स्थिर' अशा अर्थी आहे. तसेच 'अकृतग्य' 'कृतज्ञ' ह्या अर्थी पंजाबीत वापरतात. 'स्त्री' ऐंवजी 'इसतरी' असे लिहितात.

पंजाबी भाषेत बहुतांश शब्द मूळ संस्कृत भाषेतून आले आहेत. त्यामुळे ते मराठी वाचकास समजणे सोपे जातील. काही शब्द फारशी आहेत. ते संदर्भावरून समजू शकतात. काही अवघड पंजाबी शब्दांचे अर्थ आम्ही पदाचे खाली दिले आहेत.

वरील सूचना लक्षात घेऊन पदाचे वाचन केल्यास मराठी वाचकास पद वाचणे व अर्थ समजणे सोपे होईल असे वाटते.

# सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे.

**गुरुनानक मार्ग, १०३७ धनकवडी, पुणे ४३.**

रजि. E ४५५७

## सन्माननीय कार्यकारणी सदस्य

अध्यक्ष

**सरदार गुरनामसिंघ जैमलसिंघ होरा**

■

कार्याध्यक्ष

**सरदार तारासिंघ गु. गोरोवाडा**

■

खजिनदार

**सरदार कुलजीतसिंघ चौधरी**

■

सचिव

**चरणजीतसिंघ साहनी**

■

विश्वस्त

**सरदार इकबालसिंघ टी. गोरोवाडा**

**सरदार जगजीतसिंघ खालसा**

**श्री. विनायक लिमये**

॥ ओ अंकार सतिगुरु प्रसादि ॥

# श्री गुरू ग्रन्थ साहिब

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| जपु | २ |
| सोदरु महला १ | २७ |
| सो पुरखु महला ४ | ३२ |
| सोहिला महला १ | ३६ |
| **सिरी रागु - सिरीसगु (महला १)** | |
| मोती त मंदर ऊसरहि | ४१ |
| कोटि कोटी मेरी आरजा | ४२ |
| लेखै बोलणु बोलणा | ४३ |
| लबु कुता कूड़ु चूहड़ा | ४४ |
| अमलु गलोला कूड़ का | ४५ |
| जालि मोह घसि मसु | ४७ |
| सभि रस मिठे मंनिऐ | ४८ |
| कुंगू की कांइआ रतना | ४९ |
| गुणवंती गुण बीथरै | ५० |
| आवहु भैणे गलि मिलह | ५२ |
| भली सरी जिकउ बरी | ५३ |
| धातु मिलै फुनि धातु | ५४ |
| ध्रिगु जीवणु दोहागणी | ५५ |
| सुंञी देह डरावणी जां | ५६ |
| तनु जलि बलि माटी | ५७ |
| नानक बेड़ी सच की | ५९ |
| सुणि मनि मित्र पिआरिआ | ६० |
| मरणै की चिंता नही | ६१ |
| इहु मनु मूरखु लोभीआ | ६२ |
| इकु तिलु पिआरा वीसरै | ६३ |
| हरि हरि जपहु | ६५ |
| भरमे भाहि न विझवै जे | ६६ |
| वणजु करहु वणजारि आरिओ | ६७ |
| धनु जोबनु अरु फुलड़ा | ६८ |
| आपे रसीआ आपि रसु | ६९ |
| इहु तनु धरती बीजु | ६९ |
| अमलु करि धरती | ७० |
| सोई मउला जिनि | ७१ |
| एकु सुआनु दुइ सुआनी | ७२ |
| एका सुरति जेते है जी | ७३ |
| तू दरीआउ दाना बीना | ७४ |
| कीता कहा करे मनि | ७५ |
| अछल छलाई नह | ७६ |
| **सिरीरागु (महला ३)** | – |
| हउ सतिगुर सेवी | ७७ |
| बहु भेख करि भरमाईऐ | ७८ |
| जिस ही की सिरकार है | ७९ |
| जिनी सुणि कै मंनिआ | ८१ |
| जिनी इक मनि नामु | ८२ |
| हरि भगता हरि धनु | ८३ |
| सुख सागर हरि नामु है | ८५ |
| मनमुखि मोहु विआपिआ | ८६ |
| घर ही सउदा पाईऐ | ८७ |
| सचा साहिब सेवीऐ | ८८ |
| त्रै गुण माइआ मोहु है | ८९ |
| अंम्रितु छोडि बिखिआ | ९१ |
| मनमुख करम कमावणे | ९२ |
| जा पिरु जाणै आपणा | ९३ |
| गुरमुखि क्रिपा करे | ९४ |
| धनु जननी जिनि | ९५ |
| गोविदु गुणी निधानु है | ९६ |

| | |
|---|---|
| कांइआ साधै उरघ | ९८ |
| किरपा करे गुरु पाईऐ | ९९ |
| जिनी पुरखी सतिगुरु | १०० |
| किसु हउ सेवी किआ | १०१ |
| जे वेला वखतु वीचारीऐ | १०३ |
| आपणा भउ तिन पाइ ओनु | १०४ |
| बिनु गुर रोगु न तुटई | १०६ |
| तिना अनंदु सदा सुखु | १०७ |
| गुणवंती सचु पाइआ | १०८ |
| आपे कारण करता | १०९ |
| सुणि सुणि काम गहेलीए | १११ |
| इकि पिरु रावहि | ११२ |
| हरि जी सचा सचु तू | ११३ |
| जगि हउमै मैलु दुखु | ११४ |
| **सिरीरागु (महला ४)** | – |
| मै मनि तनि बिरहु | ११५ |
| नामु मिलै मनु त्रिपती | ११७ |
| गुण गावा गुण विथरा | ११८ |
| हउ पंथु दसाई नित | ११९ |
| रसु अंम्रितु नामु रसु | १२० |
| दिनसु चड़े फिरि आथ | १२१ |
| **सिरीरागु (महला ५)** | – |
| किआ तू रता देखि कै | १२२ |
| मनि बिलासु बहु रंगु | १२३ |
| भलके उठि पपोलीऐ | १२४ |
| घड़ी मुहत का पाहुणा | १२५ |
| सभे गला विसरनु | १२७ |
| सभे थोक परापते जे | १२८ |
| सोई धिआईऐ जीअ | १२९ |
| नामु धिआए सो सुखी | १३० |
| इकु पछाणू जीअ का | १३१ |
| जिना सतिगुर सिउ | १३२ |
| मिलि सतिगुर सभु | १३३ |
| पूरा सतिगुरु जे मिलै | १३४ |
| प्रीति लगी तिसु सचु | १३५ |
| मनु तनु धनु जिनि प्रभ | १३६ |
| मेरा तनु अर धनु मेरा | १३७ |
| सरणि पए प्रभु आपि | १३८ |
| उदमु करि हरि जाप | १३९ |
| सोई सासतु सउणु | १४० |
| रसना सचा सिमरीऐ | १४१ |
| संत जनहु मिलि भाई | १४२ |
| मिठा करि कै खाइआ | १४४ |
| गोइलि आइआ | १४५ |
| तिचरु वसहि सूहेलड़ी | १४६ |
| करण कारण एक | १४७ |
| संच हरि धनु पूजि सत | १४७ |
| दुक्रित सुक्रित मंधे | १४८ |
| तेरै भरोसै पिआरे मै | १४९ |
| संत जना मिलि भाई | १४९ |
| गुरु परमेसरु पूजीऐ | १५० |
| संत जनह सुणि भाई | १५२ |
| **म. १ असटपदीआ** | |
| आखि आखि मनु वाव | १५३ |
| सभे कंत महेलीआ | १५५ |
| साचु घड़ी धनु माडीऐ | १५६ |
| आपे गुण आपै कथै | १५७ |
| हरि जीउ सबदि पछाणीऐ | १५९ |
| मछुली जालु न जाणिआ | १६० |
| सतिगुर आगै अरदासि | १६१ |
| मनु जूठै तनि जूठि है | १६२ |
| पिर की नार सुहावणी | १६३ |
| जपु तपु सजंमु सधिऐ | १६४ |
| जिनी आपु पछाणिआ | १६६ |
| गुर ते निरमलु जाणिऐ | १६७ |
| सुख को मागै सभु को दुखु | १६८ |

| | |
|---|---|
| सुण मन भूले बावरे | १६९ |
| हऊ गुर पूछउ आपणे... | १७० |
| बिन पिर धन सिगारिऐ | १७१ |
| खिन महि उपजै | १७३ |
| सतिगुरू पूरा जे मिलै | १७४ |
| इकु तिल पिआरा विसरै | १७५ |
| रे मन ऐसी हरि सिउ | १७६ |
| मनमुखि गणत गणावणी | १७८ |
| मनमुखि भुलै भुलाईऐ | १७९ |
| प्रेम पदारथु पाईऐ... | १८० |
| तिसना माइआ मोहणी | १८१ |
| जित तनि नामु न भावई | १८३ |
| राम नामु मनि बेधिआ | १८४ |
| मनु हठ बुधि केतिआ | १८५ |
| चिते दिसहि धवलहर... | १८६ |
| साकत निरगुणि आरिआ | १८७ |
| डुगर देख डरावणो | १८८ |
| पुता देखि विगसिऐ | १८९ |
| मुकामु करि घरि बैसणा | १९१ |
| सबदाह माहि वखाणिऐ | १९१ |
| **म. ३ अष्टपदीआ** | |
| गुरमुखि क्रिपा करे | १९२ |
| पेईअड़ै जग जीवनु दाता | १९४ |
| हउमै करम कमावदे | १९५ |
| से जन सचे निरमले | १९६ |
| पंखी बिरखि सुहावड़ा | १९६ |
| हुकमे करम कमावणे | १९८ |
| गुरमुखि नामु धिआईऐ | १९९ |
| माइआ भूले सिध फिरेहि | २०० |
| माइआ मोहु मेरै प्रभि कीना | २०१ |
| खटु दरसन जोगी संनिआसी | २०२ |
| सहजै नो सभ लोचदी बिनु | २०३ |
| त्रिहुगुणा विचि सहजु न | २०५ |
| सतिगुरि मिलिए फेरु न पवै | २०६ |
| भगता मनि अनंदु है | २०७ |
| सतिगुरि सेविऐ मनु | २०८ |
| सतिगुरु जिनि न सेविओ | २०९ |
| **सिरिरागु महला ५** | |
| जा कउ मुसकलु अति बणै | २१० |
| सासत सिम्रित बेद चारि | २१२ |
| जानउ नही भावै कवन बाता | २१४ |
| इक सबदी बहुरूपि अवधूता | २१४ |
| **सिरिरागु महला १** | |
| जोगी अंदर जोगिआ | २१५ |
| इहु जगतु भरमि भुलाइआ | २१६ |
| सतिगुरि मिलिए फलु पाइआ | २१७ |
| आपे खसमि निवाजिआ | २१८ |
| गुर परसादी पाइआ | २१९ |
| **सिरिरागु महला ५** | |
| पैपाइ मनाइ सोइ जीउ | २२० |
| हउ आइआ सामै तिहंडिआ | २२१ |
| मै सुखी हूं सुखू पाइआ | २२१ |
| हुणि हुकमु होआ मिहरवाण | २२२ |
| हउ गोसाई दा पहिलवानडा | २२३ |
| **सिरी रागु महला १ पहरे** | |
| पहिलै पहरै रैणि कै | २२४ |
| तीजै पहरै रैणिकै वणजारिआ | २२५ |
| **सिरीरागु महला १** | |
| पहलै पहरै रैणि कै वणजारिआ | २२६ |
| तीजै पहरै रैणि कै वणजारिआ | २२७ |
| **सिरीरागु महला ४** | |
| पहलै रैणि कै वणजारिआ | २२९ |
| तीजै पहरै रैणिकै वणजारिआ | २३० |

**सिरीरागु महला ५**
पहिलै पहरै रैणिकै २३१
तीजै पहरै रैणि कै वणजारिआ २३२
**सिरीरागु महला ४ छंत**
मुंध इआणी पेईअडै २३४
हरि सति सते मेरो-बाबुला २३५
**सिरीरागु महला ५ छंत**
मन पिआरिआ जीउ मित्रा २३७
मन पिआरिआ जीउ मित्रा २३८
हठ मझाहू मा पिरी २३९
धूड़ी मजनु साध खे २४१
साई नामु अमोलु २४२
**सिरीरागु महला ४, वणजारा**
हरि हरि उत्तम नामु है २४३
जब लगु जोबनि सासु है २४४
घटि घटि रमईआ मनि वसै २४६
**सिरीरागु की वार महला ४**
रागाविच स्रीरागु है २४७
दाती साहिब संदीआ २४८
फकड़ जाती फकड़ नाउ २४९
कुदरति करिकै वसिआ सोइ २५०
कलउ मसाजनी किआ २५१
कलम जलउ सणु मसावणीए २५२
हउ हउ करती सभ मुई २५३
हुकमु न जाणै बहुता रोवै २५५
पड़ि पड़ि पंडित बेद वखाणहि २५६
पंडितु पड़ि पड़ि उचा कूकदा २५८
नानक सो सूरा वरिआमु जिनि २५९
आतमा देऊ पूजिऐ गुर कै २६१
सतिगुरु सेवे आपणा सो सिरु २६३
सतिगुरु जिनि न सेविओ २६४
जो सिरु सांई ना निवै २६६
वेस करे कुरूपि कुलखणी २६७
मनमुख मैली कामणी कुलखणी २६९
सतिगुर कै भाणै जो चलै २७०
आपणे प्रीतम मिलि रहा २७१
कुबुधि डूमणी कुदइआ २७२
जिउ पिंडु सभु तिस का २७३
**सिरीरागु कबीर जीउ का**
जननी जानत सुतु बडा होतु है २७५
**सिरीरागु त्रिलोचन का**
माइआ मोहु मनि आगलडा प्राणी २७६
**श्रीरागु भगत कबीर जीउ का**
अचरजएकु सुनहरे पंडिआ २७७
**श्री रागुबाणी भगत बेणी जीउ की**
रे नर गरभ कुंडल जब आछत २७८
**सिरीरागु बाणी भगत रविदासजी की**
तोही मोही मोही तोही अंतर कैसा २८०
**रागु माझ**
**रागमाझ (महला ४)**
हरि हरि नामु मै २८२
मधुसूदन मेरे मन तन २८३
हरि गुण पड़ीऐ हरि २८३
हरि जन संत मिलहु २८४
हरि गुर गिआनु हरि २८५
हउ गुन गोबिंद हरि २८६
आवहु भैणे तुसी मिलहु २८७
**रागमाझ (महला ५)**
मेरा मनु लोचै गुर २८८
सा रुति सुहावी जितु २८९
अनहदु बाजै सहजि सुहेला २८९
जितु घरि पिरि सोहागु २९०
खोजत खोजत दरसन चाहे २९१
पारब्रहमु अपरंपर देवा २९२
कहिआ करणा दिता लैणा २९३

दुखु तदे जा विसरि जावै २९४
लाल गुपाल दइआल २९५
धंनु सु वेला जितु मै २९६
सगल संतन पहि वसतु २९७
विसरू नाही एवड दाते २९७
सिफति सालाहणु तेरा २९८
तूं जलनिधि हम मीन २९९
अंम्रित नामु सदा निर मलिआ ३००
निधि सिधि रिधि हरि हरि ३०१
प्रभ किरपा ते हरि हरि ३०२
ओति पोति सेवक संगि ३०२
सभ किछु घर महि बाहरि ३०३
तिसु कुरबाणी जिनि ३०४
तूं पेडु साख तेरी फूली ३०५
सफलु सु बाणी जितु ३०६
अंम्रितु बाणी हरि हरि तेरी ३०७
तूं मेरा पिता तू है मेरा माता ३०८
जीअ प्रान प्रभ मनहि ३०९
सुणि सुणि जीवा सोइ तुमारी ३०९
हुकमी वरसण लागे मेहा ३१०
आउ साजन संत मीत पिआरे ३११
भए क्रिपाल गोबिंद ३१२
जिथै नामु जपीऐ ३१३
चरण ठाकुर के रिदै ३१३
मीहु पइआ परमेसरि ३१४
मनु तनु तेरा धनु भी तेरा ३१५
पारब्रहम प्रभि मेघु ३१६
सभे सुख भए प्रभ तुठे ३१७
कीनी दइआ गोपाल ३१८
सो सचु मंदरु जितु सचु ३१८
रैणि सुहावड़ी दिनसु ३१९
ऐथै तूं है आगै आपे ३२०
मनु तनु रता राम पिआरे ३२१
सिमरत नामु रिदै सुख ३२२
सोई करणा जि आपि ३२३
झूंठा मंगणु जे कोई ३२४

**रागुमाझ असटपदिआ**

**माझ महला १**

सबदि रंगाए हुकमि सबाए ३२५
साकत कुड़े सचु न भावै ३२६

**माझ महला २**

करमु होवै सतिगुरू मिलाए ३२७
पाप पुंन की सार न जाणी ३२८
मेरा प्रभु निरमल अगम अपारा ३२९
पेइअड़ै सुख दाता जाता ३३०
इकोआपि फिरै परछंना ३३१
इकि रंगिराते जो तुधु ३३२
सबदि मरै सु मुआ जापै ३३३
सभनौपिरु वसै सदा नाले ३३४
अंदरि हीरा लालु बणाइआ ३३५
तेरी भगति सची ३३६
सभ घट आपे भोगणहारा ३३७
सभु है सचा जे सचे भावै ३३८
अम्रित बाणी गुर की मीठी ३३९
अपनी किरपा करे ३४०
आपे रंगे सहजि सुभाए ३४०
रसना हरि रसिराती ३४२
सतगुरु सेविऐ वडी वडिआई ३४२
बिनु सतिगुर किहु न देखिआ जाई ३४३
आपु वञाए ता सभकिछु पाए ३४४
सबदै सादु जाणहि ३४५
तेरीआ खाणी तेरीआ बाणी ३४६
बाझु गुरू है अंध गुबारा ३४७
एथै साचे सु अगै साचे ३४८
अंतरि रतनु मिलै मिलाइआ ३४९
उतपति परलउ सबदे होवै ३५०

बिनु रासी को वथु किउ पाए ३५१
सतिगुर साची सिख सुणाई ३५२
इहु जगु वाड़ी मेरा प्रभु माली ३५३
अंम्रित नामु मंनि वसाए ३५४
अजब कंम करते हरि केरे ३५५
अंम्रितु वरसै सहजि सुभाए ३५६
सतिगुरु सेवै सो जनु सोहै ३५७
से साचे लागे जो तुधु भाए ३५८
जो सचिराते तिन ३५९
वरन रूप वरतहि सभ तेरे ३६०
माइआ महि फिरि चितु ३६१
निरमल समदु निरमल है बाणी ३६२
निरमल ते सभ निरमल होवै ३६३
गोविंदु ऊजलु उजल हंसा ३६४
गुरमुखि भगती जा आपि कराए ३६५
सचा सेवी सचु सालाही ३६५
भगत रंगि राते सदा ३६६
तेरे भगत सोहहि साचे दरबारे ३६७
सबदु विसारनि तिना ३६८
आतम राम परगासु गुर ते होवै ३६९
धावतु राखै ठाकि रहाए ३७०
इसु गुफा महि अखुट भंडारा ३७१
गुर परसादी सचा हरि पाए ३७२
गुरमुखि मिलै मिलाए आपे ३७३
गुरमुखि नामु मिलै वडिआई ३७४
एका जोति जोति है सरीरा ३७५
आपे माइआ आपे छाइआ ३७६
मेरा प्रभु भरपूरि रहिआ ३७७
घर ही महि दूजै भाइ अनेरा ३७८
हरि आपे मेले सेव कराए ३७९
जमु जागाती दूजै भाइ ३८०
ऊतमु जनमु सुथानि है वासा ३८१
हउ हउ करै तै आपु जणाए ३८२
मनमुख पडहि पंडित कहावहि ३८३
कूडु कुसतु तिना मैलु न लागें ३८४
निरगुर सरगुणु आपे खोई ३८५
निरमल हंसा प्रेम पिआरि ३८६
माइआ मोहु जगतु सबाइआ ३८६
पइअडै धनु कंतु समाले... ३८७


**माझ महला ४**


आदि पुरखु अपरंपरु आपे ३८८
अगमु अगोचरु मिति नही पाई ३८९
अंतरि अलखु न जाई लखिआ ३९०
तिसु घर सहजा सोई सुहेला ३९१


**माझ महला ५**


कउणु सु मुकता कउणु सु जुगता ३९२
गुरमुखि मुकता गुरमुखि जुगता ३९३
प्रभु अबिनासी ता किआ काड़ा ३९४
ऐथै ओथै तूं है रखवाला ३९५
नित नित दयु समालीऐ ३९५
जो हरि कीता आपणा ३९६
हरि जपि जपे मनु धीरे ३९७


**बारा माहा**

**रागु मांझ महला ५**


किरति करम के वीछुडे ३९८
चेति गोविंदु आराधीऐ ३९९
वैसाखि धीरनि किउ वाढीआ ४००
हरि जेठ जुड़दा लोड़िऐ ४००
आसाडु तपंदा तिसु लगै ४०१
सावणि सरसी कामणी चरन ४०२
भादुइ भरमि भुलाणीआ दूजै ४०३
असुनि प्रेम उमाहड़ा किउ ४०३
कतिकि करम कमावणे ४०४
मंघिरि माहि सोहंदीआ हरि पिर ४०५
पोख तुखारु न विआपई कंठि ४०५

माघि मजनु संगि साधूआ ४०६
फलगुणि अनंद उपारजना ४०७
जिनि जिनि नामु धिआइआ ४०८

**दिनरैणि**

**माझ महला ५**

सेवी सतिगुरु आपणा ४०८
जीअ की बिरथा सो सुणे ४०९
संत अराधीन सद सदा ४१०
सरब कला प्रभू पूरणो ४११

**वार माझ की**

**श्लोक महला १**

गुरुदाता गुरू हिवै ४१२
पहिले पिआरि लगा थण दुधि ४१२
दस बालतणि बीस रवणि ४१३
तूं करता पुरखु अगंमु ४१४
जीउ पाइ तनु साजिआ ४१४
देंदे था वहु दिता चंगा ४१५
तुधु आपे जगतु उपाइ कै ४१६
अखी बाझहु वेखणा ४१७
दिसै सुनिऐ जाणिऐ ४१७
सदा सदा तूं एकु है ४१८
सुइने की परबति गुफा करी कै ४१८
वसत्र पखालि पखाले काइआ ४१९
काइआ हंसि संजोगु मेलि ४१९
कुड़ु बोलि मुरदारु खाइ ४२०
जिस दै अंदरि सचु है सो सचा ४२०
इकि कंद मूलु चुणि खाहि ४२१
जे रतु लगै कपड़ै जामा ४२२
जा हउ नाही ता किआ आखा ४२२
महा रूती सभ तूं घडी मूरत ४२३
मेहर मसीति सिदकु मुसला ४२३
हकु पराइआ नानका ४२४
पंजि निवाजा वखत पंजि ४२४
इकि रतन पदारथ वणजदे ४२५
मुसलमाणु कहावणु मुसकलु ४२५
परहरि काम क्रोधु झूठु निंदा ४२६
राजे रयति सिकदार ४२६
नदीआ होवहि धेणवा ४२७
भार अठराह मेवा होवै ४२७
जे देहै दुखु लाईऐ ४२७
अगी पाला कपडु होवै ४२८
बद फैली गैबाना खसमु ४२८
सो जीविआ जिसु मनि वसिआ ४२८
किआ खाधै किआ पैधै ४२९
जाती दै किआ हथि सचु ४२९
जा पका ता कटिआ ४३०
वेखु जि मिठा कटिआ ४३०
इकना मरणु न चिति आस ४३१
मछी तारू किआ करे ४३१
कैहा कंचनु तुटै सारु ४३२
आपे कुदरति साजि कै ४३२
हम जेर जिमी दुनीआ पीरा ४३३
न दादे दिहंद आदमी ४३३
न रिजकु दसत आ कसे ४३४
परंदए न गिराह जर ४३४
सचा तेरा हुकमु गुरमुखि ४३४
सीहा बाजा चरगा कुहीआ ४३५
इकि मासहारी इकि त्रिणु खाहि ४३५
पूरे गुर की कार ४३६
तुधुभावै तो वावहि गावहि ४३६
जा तूं वडा सभि वडिआंइआ ४३७
सतिगुरु सेवि निसंगु ४३७
कलि काती राजे कासाई ४३८
कलि कीरति परगटु चानणु ४३८
भगता तै सैसारिआ ४३८
सबाही सलाह जिनी धिआइआ ४३९

| | |
|---|---|
| सेई पूरे साह जिनी पूरा पाइआ | ४४० |
| जा तूं ता किआ होरि मै | ४४० |
| अठी पहरी अठ खंड नावा खंड | ४४१ |
| पउणु गुरू पाणी पिता माता धरति | ४४१ |
| सचा भोजतु भाउ सतिगुरि | ४४२ |
| पहिरा अगनि हिवै घरु बाधा | ४४३ |
| अखणु आखि न रजिआ | ४४३ |
| विन सचे सभु कूड़ु कूड़ु कमाईऐ | ४४४ |
| नानक गुरु सतोखु रुखु | ४४४ |
| सुइने का बिरखु पत परवाला | ४४५ |
| जीवदिआ मरु मारि न पछोताइऐ | ४४५ |
| तुमी तुमा विसु अकु | ४४६ |
| मति पखेरू किरतु साथि | ४४६ |
| केते कहि वखाण कहि कहि | ४४६ |
| मंत्री होइ अठूहिआ | ४४७ |
| नानक परखे आप कउ ता | ४४७ |
| नारी पुरखु पिआरु प्रमि | ४४८ |
| मारू मीहि न त्रिपतिआ | ४४८ |
| निहफलं तसि जनमसि जावतु | ४४९ |
| खसमै कै दरबारि | ४४९ |
| खतिअहु जंमे खते करनि त | ४५० |
| नानक बोलणु झखणा दुख | ४५० |
| चारे कुडा देखि अंदरु भालिआ | ४५० |
| भै विचि जंमै भै मरै भी | ४५१ |
| भै विणु जीवै बहुतु खसीआ | ४५१ |
| सतिगुरु होइ दइआलु ता | ४५१ |
| सिरु खुहाइ पीअहि मलवाणी | ४५२ |
| अगी पाला कि करे सूरज | ४५३ |
| तुधु सचे सुबहानु | ४५४ |
| दीखिआ आखि बुझाइआ | ४५४ |
| आपि बुझाए सोई बूझै | ४५४ |
| हउ ढाढी वेकारु कारै लाइआ | ४५५ |
| परिशिष्ट १ | ४५७ |
| श्री गुरुनानक देव यांचे संक्षिप्त चरित्र | |
| परिशिष्ट २ | ४८१ |
| श्री गुरु अगंददेव यांचे संक्षिप्त चरित्र | |

❀

**आगिआ भई अकाल की तभै चलायो पंथ ।।**
**सभ सिखन को हुकम है गुरू मानिओ ग्रंथ ।।**
**गुरू ग्रंथ जी मानिओ प्रगट गुरां की देह ।।**
**जो प्रभ को मिलबो चहै खोज शबद महि लेह ।।**

(श्री. गुरू गोबिंद सिंघजी)

प्रभू परमात्म्याच्या आज्ञेप्रमाणे हा खालसा पंथ स्थापन केला. सर्व शिष्यांना आज्ञा आहे की ह्यापुढे ह्या ग्रंथासच गुरू मानावे हा ग्रंथ हा प्रत्यक्ष देहधारी गुरू आहे असे मानावे. ज्यांना प्रभू प्राप्त व्हावा अशी इच्छा असेल त्यांनी ह्या गुरूवाणीतून त्याचा शोध घ्यावा.

❀

**''जिसका कारजु तिन ही कीआ माणसु किआ वेचारा राम ।।''**

श्री. गु. ग्रं. सा. ७८४

हे कार्य ज्याचे आहे त्यानेच त्या प्रभूनेच केले आहे. बिचारा माणूस काय करणार ?

❀

**भूलन हार सभि को अभुल गुरु करतार**

सर्वच मानवांकडून चुका होतच असतात; पण चुका न करणारा एकमेव गुरू परमात्माच आहेत.

❀ ❀ ❀